**प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निरसण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विभाग व राज्य स्तरीय समित्यांमध्ये शेतकरी प्रतिनिधींचा समावेश करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रपिवियो-२०१९/प्र.क्र.०१ /११ अे,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०६ ऑगस्ट, २०१९

**वाचा :-**

१. कृषि व पदूम विभाग, शासन निर्णय क्र.प्रपिवियो-२०१९/प्र.क्र.०१/११-अे, दि.२२.०५.२०१९.
२. कृषि व पदूम विभाग, शासन निर्णय. क्र. प्रपिवियो-२०१९/प्र.क्र.०१/११-अे, दि.१२.७.२०१९.

**प्रस्तावना :-**

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१९ मध्ये संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये अधिसुचित क्षेत्रातील अधिसुचित पिकांसाठी राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या विमा कंपनींमार्फत राबविण्यात येत असून प्रधानमंत्री पीक विमा योजनेची राज्यात अंमलबजावणी करणे करिता तसेच योजनेअंतर्गत शेतकरी, लोकप्रतिनिधी इ. मार्फत उपस्थित करण्यात आलेल्या विविध तक्रारींचे निराकरण करणेकरिता राज्य, विभाग, जिल्हा तसेच तालुका स्तरावर समितींचे गठन करण्यात आलेले आहे. संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन निर्णयान्वये तालुका स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये २ शेतकरी प्रतिनिधींचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, शेतकरी, लोकप्रतिनिधी इ. मार्फत राज्य स्तर व विभागीय आयुक्त स्तरावर तक्रारींचे निराकरण करणेकरिता गठीत करण्यात आलेल्या समित्यांना तटस्थपणे भूमिका पार पाडणे शक्य व्हावे यासाठी या समित्यांमध्ये शेतकरी प्रतिनिधी तसेच राज्यस्तरीय समितीवर लोकप्रतिनिधी म्हणून २ विधानमंडळ सदस्यांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेबाबत प्राप्त होणाऱ्या विविध तक्रारींचे निरसन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विभाग स्तरावरील समितीमध्ये २ शेतकरी प्रतिनिधींचा आणि राज्यस्तरावरील समितीमध्ये २ शेतकरी प्रतिनिधी तसेच लोकप्रतिनिधी म्हणून २ विधानमंडळ सदस्यांचा समावेश करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२.     प्रस्तूत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०६१६२४५८७२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49b
fd30471850, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820d921
b663674927a476e, ou=AGRICULTURE DEPT, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=KIRAN N PATIL
Date: 2019.08.06 16:32:13 +05'30'

**( किरण पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. सह सचिव, (फलोत्पादन), कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव (११-अे / २-अे), कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१०.सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१२.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१३.वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई- ३२
१४.अवर सचिव (२- अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१५.विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, स्टॉक एक्सचेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रीट,फोर्ट, मुंबई-४०० ०२३
१६. महाराष्ट्र सुदूर संवेदन उपाययोजना केंद्र, नागपूर, (MRSAC)
१७.स्कायमेट वेदर सर्व्हिसेस लि., यांचे प्रतिनिधी
१८. भारतीय हवामान विभाग (IMD), यांचे प्रतिनिधी
१९.राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC), यांचे प्रतिनिधी
२०.निवड नस्ती (कार्यासन ११-अे).